# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २६ जुलै, २०१७ / श्रावण ४, १९३९ ( शके )**

**(१) वित्त व नियोजन, वने मंत्री**
**(२) ग्रामविकास, महिला व बालविकास मंत्री**
**(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**
**(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**
**(५) जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री**
**(६) रोजगार हमी, पर्यटन मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेमध्ये समाविष्ट केलेल्या २७ गावांतील शाळांची झालेली दुरवस्था

**(१) * ८५८३८ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या २७ गावांतील शाळा जिल्हा परिषदेकडे असून या शाळांकडे

दोन्ही प्रशासनांकडून दुर्लक्ष होत असल्याने शाळांची दुरुस्ती व देखभालीअभावी दुरवस्था झाली असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांची पाहणी शासनाने केली आहे काय व पाहणीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्यानुसार सदर शाळांची दुरुस्ती व देखभाल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) सदर शाळांची पाहणी करण्यात आली आहे. कल्याण तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा पिसवली आणि जिल्हा परिषद शाळा नांदिवली कोळे या दोन शाळा इमारतींच्या दुरुस्तीची आवश्यकता आहे.

(३) जिल्हा परिषद, नांदिवली कोळे या शाळेच्या दुरुस्तीचे काम सुरु करण्यात येत आहे. तसेच, जिल्हा परिषद शाळा पिसवली या शाळेच्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे प्रयोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हा परिषदेमध्ये कृषी योजना राबवितांना झालेली अनियमितता

**(२) * ९१३६८ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांनी सन २०१३-१४ या वर्षामध्ये सर्वसाधारण योजने मधून ९० टक्के अनुदानावर ग्रेडर पुरविणे, सन २०१५-१६ या वर्षामध्ये ७५ टक्के अनुदानावर ताडपत्री पुरविणे, आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना पि.व्ही.सी. पाईप पुरविणे याबाबतच्या जिल्हा परिषद कृषी विभागाच्या अनेक योजना राबवितांना अनियमितता केली असल्याचे दिनांक २५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाभार्थीची निवड करत असतांना शासन निर्णयामध्ये बदल करणे, माहिती लपवून शासनाची दिशाभूल करणे व पात्र लाभार्थीना वंचीत ठेवल्याबाबत यवतमाळ जिल्हा नियोजन समितीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांच्याकडून चौकशी करण्यात आली असता संबंधित अधिकारी दोषी असल्याचे आढळल्याने कृषी संचालक, पुणे यांच्याकडे निलंबनाचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन कृषी विकास अधिकारी यांना निलंबित करुन कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

सन २०१५-१६ या वर्षामध्ये ७५ टक्के अनुदानावर ताडपत्री पुरविणे ही योजना राबवितांना अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) व (३) होय.

मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,यवतामाळ यांचे दि. २७/९/२०१६ पत्रान्वये तत्कालीन कृषी विकास अधिकारी यांना निलंबीत करून त्यांचे विरूध्द खाते चौकशी सुरू करण्याबाबत सचिव,कृषी विभाग यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भातील पाच वनक्षेत्रात सागवान वृक्ष अवैधरित्या तोडल्याबाबत

**(३) * ८७९३१ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील पाच वनक्षेत्रात माहे एप्रिल, २०१६ ते मार्च, २०१७ या एका वर्षाच्या कालावधीत ७२०२ सागवान वृक्ष अवैधरित्या तोडल्याची माहिती माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान वन विभागाने दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वनक्षेत्रात अवैधरित्या वृक्षतोड करणाऱ्यांवर व संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली व केलेल्या कारवाईचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, या वनक्षेत्रात अवैधरित्या होत असलेली वृक्षतोड थांबविण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) विदर्भातील पाच वनवृत्तात माहे एप्रिल, २०१६ ते मार्च, २०१७ या एका वर्षाच्या कालावधीत २०३६५ सागवान वृक्षांची तोड झालेली आहे.

(२) अवैध वृक्षतोडीस जबाबदार असलेल्या गुन्हेगारांवर नियमानुसार कारवाई करण्यात आली आहे. अवैध वृक्षतोडीच्या अनुषंगाने एकूण ९६४५ वनगुन्हे नोंदविले असून त्यापैकी ४१ वनगुन्हे प्रकरणे न्यायालयात दाखल केलेली आहेत. याव्यतिरिक्त अवैध वृक्षतोडीस जबाबदार असलेल्या वनपरिक्षेत्र अधिकारी-१, क्षेत्र सहायक-१, वनसर्व्हेअर-१, वनरक्षक-५ व वनमजूर-१ यांचेविरुध्द निलंबनाची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(३) विदर्भातील अवैध वृक्षतोड थांबविण्याबाबत प्रामुख्याने खालीलप्रमाणे उपाय योजना करण्यात येतात.

- वृक्षतोडीबाबत माहिती मिळण्याकरीता हॅलो फॉरेस्ट दुरध्वनी क्रमांक १९२६ हा २४ तास कार्यान्वित आहे.
- वनपरिक्षेत्र अधिकारी यांना प्रभावी संरक्षणासाठी वाहने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.
- प्रत्येक नागरिकास वन व वन्यजीवांचे संरक्षण व संवर्धन करण्याची संधी उपलब्ध करून देणे व लोकसहभागातुन वन, वन्यजीव संवर्धन व संरक्षण प्रभावीपणे करण्यासाठी हरितसेनेची वेबसाईटवर नोंदणी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
- वनांमध्ये फिरतेपथक, गस्तीपथकाद्वारे संरक्षणाची कामे करण्यात येतात.
- एस.आर.पी.च्या तुकडया कार्यरत आहेत. अवैध वृक्षतोड/अतिक्रमण सारख्या संबंधित कार्यावर त्यांची मदत घेण्यात येते.
- अवैध वृक्षतोड नियंत्रणासाठी गुन्हेगारांवर वन अधिनियम १९२७ चे कलम २६ व ६८ द्वारे कार्यवाही करण्यात येत आहे.
- मोक्याच्या ठिकाणी तपासाणी नाके, निरिक्षण मनोरे उभारलेले आहेत.
- नियतक्षेत्र तपासणीचा कार्यक्रम राबविण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील जलयुक्त शिवार योजनेच्या प्रलंबित कामांबाबत**

**(४) * ८८१६४ श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील जलयुक्त शिवार योजनेच्या कामांसाठी दोन कोटी रुपये खर्चाचा प्रस्ताव मंजूर असून या कामांसाठी नेमलेले ठेकेदार कामे करत नसल्याने अनेक कामे प्रलंबित असल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनाच्या निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच धामणी, पाथरज व आसल (ता.कर्जत, जि.रायगड) या भागात जलयुक्त शिवार अभियान सन २०१६-१७ कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेली कामे निकृष्ट दर्जाची असल्याच्या तक्रारी नागरीकांनी व लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत व निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कर्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) होय.

(४) प्रस्तुत तक्रारीच्या अनुषंगाने मंडळ कृषि अधिकारी यांचेमार्फत कामाची चौकशी करून ठेकेदाराला ज्ञापनाद्वारे सुचित करण्यात आले होते. सद्यस्थितीत काम योग्यरितीने पूर्ण झाले असून पूर्ण क्षमतेने पाणीसाठा झाला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील रस्त्यांच्या कामांबाबत**

**(५) * ८४८९६ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.संदीप**

**नाईक (ऐरोली), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून राज्यात पहिल्या टप्प्यात ५२०० कि.मी. रस्ते करण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे स्वरुप काय आहे व पहिल्या टप्प्यात कोणकोणत्या जिल्ह्यांच्या रस्त्यांची कामे सुरु करण्यात येणार आहेत,

(३) असल्यास, सदर योजनेतून रस्त्यांची कामे सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून राज्यात पहिल्या टप्प्यात २००० कि.मी. व दुसऱ्या टप्प्यात ५२०० कि.मी. ग्रामीण भागातील दुरावस्था झालेल्या रस्त्यांची दर्जोन्नती करण्याचा निर्णय शासनाने माहे डिसेंबर २०१५ मध्ये घेतला आहे.

(२) महाराष्ट्र राज्यातील न जोडलेल्या वाडया-वस्त्या जोडणे व ग्रामीण भागातील दुरवस्था झालेल्या रस्त्यांची दर्जोन्नती करणे हे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे स्वरुप आहे. पहिल्या टप्प्यात सर्व जिल्हात रस्त्याची कामे सुरु करण्यात आली आहेत.

(३) सदर योजनेमध्ये निवडलेल्या रस्त्यांच्या कामांना प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता प्रदान करुन निविदांना मंजूरी देण्यात आली आहे. कामांचे कार्यारंभ आदेश देण्यात आले असून या रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात बेकायदेशीरित्या नर्सिंग होम सुरु असल्याबाबत

**(६) * ८४८३४ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी),**

**श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १५ मार्च ते २८ एप्रिल, २०१७ या दरम्यान नर्सिंग होम तपासणी विशेष मोहीम राबविली असता अनेक ठिकाणी कायदेशीर तरतुदींचे पालन न करता बेकायदेशीर एकूण ३७९५ नर्सिंग होम सुरु असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल कायद्यातंर्गत आवश्यक नोंदणी नसलेली नर्सिंग होम, बोगस डॉक्टर, अपात्र कर्मचारी वर्ग असलेली अनेक नर्सिंग होम व खाजगी रुग्णालयांची माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार बेकायदेशीर नर्सिंग होम व संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) होय.

(४) तपासणी पथकाचे सर्व चौकशी अहवाल जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीसमोर सादर केले असून समितीने संबंधीतांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. समितीच्या शिफारशीनुसार १५ बोगस डॉक्टरांविरुध्द एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात राबविण्यात येत असलेल्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेबाबत**

**(७) * ८५७८९ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.जयकुमार गोरे (माण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत राज्यातील ग्रामीण भागातील मजुरांना काम मिळावे व गावांचा विकास व्हावा यासाठी शासनाने ग्रामपंचायतींसाठी करोडो रुपयांच्या निधीची तरतूद केली असतानाही राज्यातील ९०२२ गावात मनरेगा योजना अद्यापही राबविण्यात आली नसल्याचे दिनांक २२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाची ही योजना मजुरांच्या हिताची असतानाही अधिकारी व कर्मचारी यांच्या दुलर्क्षतेमुळे मनरेगा योजना या गावांमध्ये राबविण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी करुन सदर योजना न राबविणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व या गावांमध्ये मनरेगा योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे अंशत: खरे आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेकरीता वर्ष २०१७-१८ साठी ८.०० कोटी मनुष्यदिवस निर्मितीचे लेबर बजेट केंद्र शासनाने मंजूर केलेले आहे. सदर योजना ही मागणी आधारित असल्यामुळे बऱ्याचशा ग्रामपंचायतीमध्ये शेल्फवर कामे उपलब्ध असूनही कामाची मागणी न आल्यामुळे अनेक ग्रामपंचायती अंतर्गत कामे झालेली नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

(२) हे खरे नाही.

लेबर बजेट मंजूर करताना प्रत्येक ग्राम पंचायतीचा विचार करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील आरोग्य विभागात वाढीव लोकसंख्येवर आधारित मंजूर करण्यात आलेली पदे भरण्याबाबत**

**(८) * ९१०७५ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रात सन १९९१ च्या लोकसंख्येवर आधारित मंजूर पदांपैकी २० टक्के पदे रिक्त असून सन २००१ च्या वाढीव लोकसंख्येवर आधारित मंजूर करण्यात आलेली पदे भरली नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील आरोग्य विभागात मंजूर असलेल्या एकूण ५३५९३ पदांपैकी १५२०२ पदे रिक्त असून या पदांशिवाय तांत्रिक पदे रिक्त असल्याने रुग्णांसाठी आवश्यक असलेली यंत्रे विनावापर पडून आहेत, तसेच रुग्णांसाठी शासनाच्या असलेल्या विविध योजनांची योग्य प्रकारे अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व पदांचा आढावा घेऊन आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत गट-अ ते गट-ड ची मंजूर पदे ५३६२८, भरलेली ३४८३३ तर रिक्त पदे १५१९५ आहेत. तांत्रिक संवर्गातील विशेषज्ञ कर्मचाऱ्यांमार्फत रुग्णालयातील यंत्रसामुग्री वापरात असून ती विनावापर पडून नाही.मात्र जेथे नियमित विशेषज्ञ पदे रिक्त आहेत तेथे राष्ट्रीय आरोग्य अभियांनातर्गत कंत्राटी तज्ञांमार्फत सेवा पुरविल्या जातात.

(३) वैद्यकीय अधिकारी पदासाठी भरती प्रक्रिया शासनस्तरावर वेळोवेळी राबविण्यात आल्या,परंतु उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे तसेच प्राप्त उमेदवार नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यामुळे तसेच सेवांतर्गत वैद्यकीय अधिका-यांना पदव्युत्तर प्रशिक्षणासाठी प्रतिनियुक्त केल्याने वैद्यकीय अधिका-यांची पदे रिक्त राहत आहेत. वैद्यकीय अधिका-यांची भरती प्रक्रिया करण्याचे अधिकार शासनाने जिल्हयाधिका-यांना सोपविले असून जिल्हास्तरावरुन भरती प्रक्रिया करुन वैद्यकीय अधिका-यांचे नियुक्तीचे आदेश देण्याबाबत अधिकार प्रदान करण्यात आले आहेत व त्यानुसार पदभरती प्रक्रिया सुरु आहे.

तसेच जिल्हापरिषद स्तरावरील गट-क व गट-ड च्या पदांची भरती प्रक्रिया राबविण्यासाठी बिंदुनामावली तयार करणे व बिंदुनामावलीला मागासवर्ग कक्षाची मान्यता घेण्याची प्रक्रिया सुरु आहे.

राज्यस्तरावरील गट-क व गट-ड च्या पदभरतीबाबत लेखी परिक्षा घेण्यात आल्या असून निकाल जाहिर झाला आहे व नियुक्त्यांबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील मेयो, मेडीकल रूग्णालयात व उल्हासनगर (जि.ठाणे) मध्यवर्ती रूग्णालयात थॅलेसेमिया औषधांचा तुटवडा असल्याबाबत

**(९) * ८६१२९ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मेयो, मेडीकल रूग्णालयामध्ये थॅलेसेमियाच्या औषधांच्या साठयात तुटवडा निर्माण झाल्यामुळे नागपूर जिल्हयासह गडचिरोली, गोंदिया व इतरत्र ठिकाणाहून येणारे थॅलेसेमियाबाधीत रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण झाल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच ठाणे जिल्हयातील उल्हासनगर मध्यवर्ती रूग्णालयात थॅलेसेमिया औषधांचा तुटवडा असल्याची बाब स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल ते जून, २०१७ या कालावधीमध्ये पत्रव्यवहाराव्दारे शासनाच्या निदर्शनास आणली असून

याबाबत संबंधित अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यासह मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्या दिनांक ५ एप्रिल, २०१७ रोजीच्या बैठकीमधील आश्वासनानंतरही अद्याप औषधांचा पुरेशा प्रमाणात पुरवठा करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूरसह बाहेरच्या जिल्हयातील रूग्णांकरीता एक महीन्यांचा औषधांचा साठा रूग्णालयामार्फत उपलब्ध करून देण्याचे निर्देश नागपूर जिल्ह्याचे मा.पालकमंत्री यांनी देऊन सुध्दा थॅलेसेमियाबाधीत रूग्णांना केवळ सातच दिवसांची औषध देण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, थॅलेसेमियाच्या आजारावरील महत्वाच्या औषधांच्या साठयामध्ये वाढ करून पुरवठा सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या हिमॅटॉलॉजी कार्यक्रमांतर्गत राज्यामध्ये प्रायोगिक तत्वावर जिल्हा रुग्णालय, ठाणे, नाशिक, सातारा व अमरावती तसेच के.ई.एम. रुग्णालय, मुंबई व बी.जे. वैद्यकीय महाविद्यालय, पुणे या सहा ठिकाणी थॅलेसेमिया या आजारावर मार्च, २०१३ पासून मोफत उपचार करण्यात येत आहेत. उल्हासनगर येथील शासकीय रुग्णालय हे हिमॅटॉलॉजी कार्यक्रमाचे मान्यताप्राप्त केंद्र नाही. तथापि, तेथील थॅलेसेमिया रुग्णांची संख्या विचारात घेता सदर रुग्णालयास जिल्हा रुग्णालय, ठाणे येथून Iron Chelation च्या गोळ्या पुरविण्यात येतात. तसेच आवश्यकतेनुसार स्थानिक स्तरावर औषधे खरेदी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) थॅलेसेमिया औषधांच्या खरेदीबाबत आरोग्य सेवा संचालनालयाकडून दि.२३.०६.२०१७ रोजी पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

तसेच थॅलेसेमिया आजारावरील टॅब्लेट डेफ्रासिरॉक्स ५००mg, २५०mg, १००mg ही औषधी वैद्यकीय संचालनालयाच्या दरकरारावर असून ही औषधी पुरेशा प्रमाणात उपलब्ध करुन ठेवण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात कुपोषणामुळे बालकांच्या मृत्यूमध्ये झालेली वाढ**

**(१०) * ८५१५१ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.अजित पवार (बारामती) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आरोग्य संचालनालयाने सन २०१६ मध्ये केलेल्या अहवालात २०१४-१५ मध्ये ३७९५३ तर २०१५-१६ मध्ये २४४२० असे एकूण ६२००० पेक्षा जास्त कुपोषित बालकांची संख्या राज्यात असून २१ टक्के बालकांचे मृत्यू हे कमी वजनामुळे होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात गेल्या वर्षी ९ हजार बालमृत्यू झाले असून १६ आदिवासी जिल्ह्यात माहे मार्च, २०१७ अखेरपर्यंत २८११ बालकांचे मृत्यू झाले, ग्रामीण भागातील विशेषत: आदिवासी पाड्यांवरील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्य शासनाकडून कोट्यवधी रुपये खर्च करुन विविध योजना राबविल्या जात असताना सन २०१५-१६ या वर्षी आदिवासी भागांमध्ये २७४३२ तीव्र कमी वजनाची बालके कुपोषित आढळून आल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी भागातील, कुपोषणाच्या समस्येवर मात करण्यासाठी, शासनाच्या महिला व बाल विकास विभाग, आदिवासी विभाग आणि सार्वजनिक आरोग्य विभागाने समन्वयाने योजनाबध्द प्रयत्न करण्याचे, मा.मुख्यमंत्री महोदयांनी, आदेश देऊनही अद्याप कुपोषणाची समस्या संपुष्टात येण्याऐवजी सातत्याने वाढत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आदिवासी बालकांना कुपोषणाच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी, टाटा ट्रस्टच्या सहाय्याने पालघरमध्ये राबविण्यात येत असलेल्या विशेष योजनेचे स्वरुप काय आहे,

(५) तसेच राज्यातील बालकांचे कुपोषण नियंत्रणात आणण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

राज्यात आरोग्य संचालनालयाकडे कुपोषित बालकांच्या संख्येबाबत १६ आदिवासी जिल्ह्यांमधील क्षेत्रामध्ये २०१४-१५ मध्ये २५२८९ तर २०१५-१६ मध्ये २०४३५ असे या दोन वर्षात एकूण ४५७२४ कुपोषित बालकांची संख्या राज्यात होती. नवसंजीवनी कार्यक्षेत्रातील एकूण ० ते ६ वर्ष वयोगटातील बाल मृत्यूपैकी ९.४ टक्के बालकांचे मृत्यू हे कमी वजनामुळे होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) राज्यात सन २०१६-१७ मध्ये डीएचआयएस-२ च्या अहवालानुसार एकुण २१९८५ बालमृत्यू झाले. तसेच माहे एप्रिल २०१६ ते मार्च २०१७ पर्यंत नवसंजीवनी अहवालानुसार आदिवासी क्षेत्रात एकुण २८१८ बालमृत्यू झाले.

नवसंजीवनी अहवालानुसार सन २०१५-१६ मध्ये तीव्र कुपोषित (SAM) व मध्यम कुपोषित (MAM) असलेली अनुक्रमे २८३४ व १७६०१ बालके होती.

(३) हे खरे नाही.

(४) टाटा ट्रस्ट ही संस्था पालघर जिल्हयामध्ये आरोग्य व पोषणाच्या उपाययोजनाच्या कृती एकत्रितपणे राबविण्याकरता AAA पध्दतीच्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करून पुढील प्रमाणे सहाय्य करणार आहे-

मंत्रालय व जिल्हाधिकारी कार्यालयात तांत्रिक सहाय्य कक्ष स्थापित करणे, मॉडेल अंगणवाडी केंद्राची संकल्पना आणणे, अंगणवाडी सेविकेना टॅबलेट चे वाटप करून रियल टाईम मुल्यांकन, लाभार्थ्यांना सेवा मिळणे सुलभ करणे, मुल्यांकन व मुल्यमापन इ.

(५) आजारी सॅम बालकांना बालउपचार केंद्र व पोषण पुनर्वसन केंद्रामध्ये भरती करून पोषण व उपचार, द्विवार्षिक जीवनसत्व अ व जंतनाशक मोहिम या कार्यक्रमाद्वारे स्तनपानास प्रोत्साहन, निपी कार्यक्रमाद्वारे सर्व वयोगटांना लोहयुक्त गोळ्या व जंतनाशक गोळ्या, पालघर जिल्हयामध्ये कुपोषणाने होणारे बालमृत्यू टाळण्यासाठी विशेष कृती दलाची स्थापना इ.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे काळटेक (ता.साक्री, जि.धुळे) येथे टॉवरच्या पवनऊर्जा वाहिनीतील शॉर्ट सर्कीटमुळे वनक्षेत्राला आग लागल्याबाबत

**(११) * ८९०२१ श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे काळटेक (ता.साक्री, जि.धुळे) पचाळे सिंदबन गट ग्रामपंचायत हद्दीतील अनुसूचित क्षेत्रातील वन विभागामध्ये सुझलॉन कंपनीने उभारलेल्या टॉवरच्या पवनऊर्जा वाहिनीतील शॉर्ट सर्कीटमुळे ७२ हेक्टर वनजमिनीपैकी ७० ते ८० टक्के वनक्षेत्र जळून खाक झाल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या आगीत मोठया प्रमाणात उपलब्ध असलेल्या गुरांचा चारा जळून गेला असून वन्य पशू पक्षांसह आदिवासी शेतकऱ्याचा बैल मृत झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीकडून येथील वन संवर्धनाची नुकसान भरपाई मिळावी आणि जळीत जंगलातील वन संवर्धनाचे काम पुन्हा नव्याने सुरु करावे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) मौजे काळटेक (ता.साक्री,जि.धुळे) पचाळे सिंदबन गट ग्रामपंचायत हद्दीतील अनुसूचित क्षेत्रातील वनविभागामध्ये सुझलॉन कंपनीने उभारलेल्या टॉवरच्या पवनऊर्जा वाहिनीतील शॉर्ट सर्कीटमुळे दिनांक २८.३.२०१७ रोजी कोंडाईबारी वनक्षेत्रातील ब्राम्हणवेल परिमंडळातील विटावे नियतक्षेत्रातील कक्ष क्र.१४६ यातील संयुक्त वन व्यवस्थापन समिती मौजे सिनबन क्षेत्र २५ हे. पंचम वर्षीय रोपवन व म.ग्रा.रो.ह.यो. अंतर्गत पंचम वर्ष रोपवन क्षेत्र २५.०० हेक्टर असे एकूण ५० हेक्टर क्षेत्रापैकी ३५.०० हेक्टर रोपवन क्षेत्रातील पालापाचोळा जळून नष्ट झाल्याने दिनांक २८.३.२०१७ अन्वये वनगुन्हा दाखल केला असून त्या जागेचा जीपीएस पॉलीगॉन काढलेला आहे. सदर घटनेबाबत निजामपूर पोलीस स्टेशनला दिनांक २८.३.२०१७ रोजी तक्रार दाखल केली आहे.

(२) सदर आगीत जमिनीलगतचा पालापाचोळा व गवत जळीत झालेले आहे. कुठल्याही प्रकारचा वन्यप्राणी व पशुपक्षी मृत झालेला आढळून आलेला नाही. तसेच कुठल्याही प्रकारची जिवीत अथवा पशु हानी झालेली नाही. दिनांक २८.३.२०१७ नुसार नुकसानाची अंदाजित रक्कम रु.१,३५,०००/- दर्शविण्यात आलेली आहे.

(३) व (४) याबाबत नुकसानीस कारणीभूत असणाऱ्या कंपनी विरोधात न्यायालयात तक्रार दाखल करणेची कार्यवाही करण्यात येत आहे. कायदेशीर तरतुदीनुसार संबंधितावर कार्यवाही व नुकसान भरपाईबाबत कार्यवाही करणेबाबत

न्यायालयास विनंती करणेत येत आहे. या कंपनीकडून ऊर्जा निर्मितीची कार्यवाहीसाठीची पवनचक्की वनक्षेत्रात असल्याने, वनक्षेत्र जळीत होण्याची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी तांत्रिक दृष्टया सक्षम प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत संबंधितास सक्त ताकीद देण्यात आलेली आहे.

-----------------

**राज्यात जिल्हा रुग्णालये व ग्रामीण रुग्णालयांसह प्राथमिक आरोग्य केंद्रांवर स्वानदंशाच्या लसींचा तुटवडा असल्याबाबत**

**(१२) * ८५९३८ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अजित पवार (बारामती), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कुत्रे चावण्याच्या सुमारे २ ते २.५० लाख घटना घडत असताना गेल्या वर्षी सार्वजनिक आरोग्य विभागाने स्वानदंशाच्या लसींची खरेदी न केल्यामुळे आरोग्य विभागाच्या अखत्यारितील जिल्हा रुग्णालये व ग्रामीण रुग्णालयांसह प्राथमिक आरोग्य केंद्रावर स्वानदंशाच्या लसींचा मोठया प्रमाणावर तुटवडा असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य विभाग स्वानदंशाची लस १३७ रुपये प्रति वायल या दराने खरेदी करीत असून भारत बायोटेक कंपनी सदरहू लस १२६ रुपये प्रति वायल दराने देण्यास तयार असताना स्वानदंशावरील लस खरेदी न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत व स्वानदंशावरील लस सर्व रुग्णालयांमध्ये पुरेशा प्रमाणात उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील आरोग्य संस्थामध्ये श्वानदंश लसीचा साठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.
(२) सन २०१६ मध्ये आरोग्य सेवा संचालनालयाच्या दिनांक २८.०३.२०१६ च्या आदेशान्वये मे.भारत बायोटेक इंटरनॅशनल लि. यांच्याकडून रुपये १२६ प्रति वायल या दराने श्वानदंश लसीची खरेदी करण्यात आली होती.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये देखील श्वानदंश लसीच्या खरेदीकरीता मे.भारत बायोटेक इंटरनॅशनल लि. यांना प्रति वायल (IM Injection) रुपये १२६ या दराने श्वानदंश लसीचा पुरवठा करण्याबाबत आरोग्य सेवा संचालनालयाने दिनांक २८.०६.२०१७ रोजी पुरवठा आदेश दिले आहेत.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरात माता मृत्यूच्या प्रमाणात झालेली वाढ

**(१३) * ८६०१२ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात १७५ मातामृत्यू झाले असून माहे जानेवारी ते मे, २०१७ या कालावधीत पूर्व विदर्भात ९३ मातामृत्यू झाल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, 'व्हिजन-२०२०' अंतर्गत आरोग्य विभागाने मातामृत्यूचे प्रमाण कमी करण्याचा कार्यक्रम आखला असून उपराजधानीत हा कृती कार्यक्रम आखलाच गेलेला नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गरोदरपणाच्या काळात पोषक आहार, आरोग्यसेवेचा अभाव, १०० पैकी ५० महिला ह्या रक्तक्षयग्रस्त असल्याने होणाऱ्या रक्तस्त्रावामुळे मातांचे मृत्यू होत असून १७५ मातांचे मृत्यू मेयो, मेडिकल, डागा इत्यादी शासकीय रुग्णालयात झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार मातामृत्यू रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

०१ एप्रिल, २०१६ ते ३१ मार्च, २०१७ या कालावधीत नागपूर महानगरपालिका कार्यक्षेत्रात शासकीय रुग्णालयात १६३ आणि खाजगी रुग्णालयात १२ असे एकूण १७५ माता-मृत्यू झाले आहेत.

तसेच जानेवारी, २०१७ ते मे, २०१७ अखेर पूर्व विदर्भात झालेल्या माता मृत्यू पुढील प्रमाणे

| नागपूर परिमंडळ क्षेत्रातील | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| नागपूर | चंद्रपूर | भंडारा | गोंदिया | वर्धा | गडचिरोली | एकूण |
| २ | ९ | १२ | ७ | ११ | ८ | ४९ |

(२) हे खरे नाही.

मातामृत्यु कमी करण्यासाठी शासनामार्फत खालीलप्रमाणे योजना राबविल्या जातात.

१) जननी सुरक्षा योजना, २) जननी शिशु सुरक्षा योजना ३) नि:शुल्क १०८ ॲम्ब्युलन्स सेवा ४) नियमित लसीकरण कार्यक्रम ५) प्रधानमंत्री मातृत्व योजना

(३) नागपूर शहरात झालेल्या एकूण १७५ मातामृत्युंपैकी २० मातांना रक्तक्षयाचे निदान झाले होते. १७५ मातामृत्युपैकी मेयो रुग्णालयात १९, डागा येथे १ आणि GMC मेडिकल रुग्णालय येथे १४३ माता मृत्यू झाले आहेत.

(४) होय.

(५) माता मुत्युचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन पुढील प्रमाणे योजना राबवित आहे :-

अ) पोषक आहाराचे वाटप I.C.D.S. अंतर्गत अंगणवाडीतर्फे केले जाते.

ब) वैद्यकीय तपासणी धनुर्वाताची लस, स्वाईन फ्लू लस, आयर्न, कॅल्शियमच्या गोळ्या इ. सेवा नि:शुल्क पुरविण्यात येतात.

क) प्रसूतीकाळात मोफत पोषक आहार, जननी सुरक्षा योजनेअंतर्गत पुरविल्या जाते.

त्या खेरीज केंद्राच्या विविध योजना राबविल्या जातात.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील बालसुधारगृहात अश्लील चित्रफित दाखवून मुलांचे लैंगिक शोषण केल्याबाबत

**(१४) * ८५८८६ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील शिवाजी नगर भागात शासनाच्या बालसुधारगृहात ई-लर्निंगच्या पडद्यावर अश्लील चित्रफित दाखवून मुलांचे लैंगिक शोषण केल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणात अधिक्षकासह, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचाही समावेश होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाबाबत नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल संशयास्पद असल्याच्या कारणास्तव प्राप्त अहवाल रद्द करुन नवीन चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) दैनिक केसरी च्या दिनांक ३/५/२०१७ व दिनांक ४/५/२०१७ च्या अंकामध्ये अशा आशयाचे वृत्त प्रसारित झाले आहे. तसेच याबाबत सहयाद्री आदिवासी विकास प्रतिष्ठान बालकाश्रम पळस्टिका ता.आंबेगाव जि.पुणे यांनी आयुक्त महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांचेकडे तक्रार केली आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी शिवाजीनगर पोलिस स्टेशन येथे गुन्हा क्र १५४/२०१७ दाखल झाला असून पोलीस तपास चालू आहे. तसेच सहयाद्री आदिवासी विकास प्रतिष्ठान बालकाश्रम पळस्टिका ता.आंबेगाव जि.पुणे यांनी घेतलेले आक्षेप व केलेली तक्रार यास अनुसरुन आयुक्त महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांनी सर्वसमावेशक चौकशी करीता त्रिसदस्यीय समिती नेमली आहे.

(४) चौकशी सुरु असून सदर चौकशी समितीचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना जिल्हयातील आरोग्य विभागाच्या रिक्त पदांबाबत

**(१५) * ८९७३२ श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील आरोग्य विभागात भुलतज्ञांसह डॉक्टरांची व वर्ग क, ड कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त असून, १० बेड्सचे आयसीयू (ICU) यूनिट बंद असणे, एक्सरे मशीन विनावापर पडून असणे, इसीजी (ECG) तंत्रज्ञ नसल्याने मशीन बंद असणे, इत्यादी समस्यांमुळे रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयांतील त्रुटींमुळे अनेक रुग्णांना खाजगी रुग्णालयांकडे नाईलाजास्तव जावे लागत असल्याने शासनाने याबाबतची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार रिक्त पदे भरण्याबाबत व रुग्णालयास सोयी सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

जालना जिल्हयातील आरोग्य विभागांतर्गत आरोग्य संस्थामध्ये भुलतज्ञांची पदे भरलेली आहेत. तसेच वैद्यकीय अधिकारी वर्ग-१ (ग्रेड पे रु.६६००) संवर्गाची ३५ पदे मंजूर असून त्यापैकी१६ पदे भरलेली आहेत. वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.५४००/-) संवर्गाची १६९ पदे मंजूर असून त्यापैकी १५५ पदे भरलेली आहेत. गट-क व गट-ड संवर्गाची एकूण १४५० पदे मंजूर असून त्यापैकी १०३२ पदे भरलेली आहेत.

जिल्हा रुग्णालय जालना येथे आयसीयु युनिट व क्ष-किरणयंत्र कार्यान्वित आहे. तसेच इसीजी तंत्रज्ञ उपलब्ध असून इसीजीची सुविधा सुरु आहे.

उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून रुग्णांना आवश्यक ती रुग्णसेवा उपलब्ध करुन देण्यात येत असून रुग्णांची गैरसोय होऊ दिली जात नाही.

(३) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड पे रु.६६००) संवर्गाची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.५४००/-) संवर्गाची रिक्त पदे Walk in Interview च्या माध्यमातून जिल्हाधिकारी यांच्या स्तरावरुन भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

तसेच गट-क व गट-ड संवर्गाची लेखी परिक्षा झाली असून रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आदिवासी भागातील मुलांना ईझी नट पेस्ट पाकीट देण्याचा घेतलेला निर्णय

**(१६) * ८५७५६ डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा**

**गायकवाड (धारावी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी भागातील मुलांना कुपोषणमुक्त करण्यासाठी राज्य शासनाने तीव्र कुपोषित गटातील मुलांना ईझी नट पेस्ट पाकीट देण्याचा निर्णय माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पेस्टच्या आहारात अनेक त्रुटी असून कोणताही आहारशास्त्रीय अभ्यास न करता या पेस्टचे वाटप मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीने हिताचे नसल्याचे मत आरोग्यतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रस्तावाचा जन आरोग्य अभियान व अन्न अधिकार अभियानाने तीव्र विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार सदर पेस्टचे वाटप न करता ताजा सकस आहार वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

कुपोषित बालकांना द्यावयाचा आहार हा ईजी नट पेस्ट नसून Energy Dense Nutritious Food (EDNF) आहार आहे.

(२) नाही.

बालरोग तज्ञ, आहार तज्ञ व युनिसेफचे प्रतिनिधी यांनी राज्यातील कुपोषित बालकांना Energy Dense Nutritious Food (EDNF) देणेबाबत केलेल्या शिफारशी विचारात घेऊन विभागाने EDNF ही पेस्ट देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

(३) नाही. या विभागाकडे याबाबतचा कोणताही अर्ज प्राप्त झालेला नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे वरंध (ता.महाड, जि.रायगड) येथील भावे आरोग्य उपकेंद्राच्या दुरवस्थेबाबत**

**(१७) * ८८२२९ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) तालुक्यातील भावे, भावेपठार, पिंपळदरी, मोरानडेवाडी या गावांसह अतिदुर्गम गावातील नागरीकांना प्राथमिक स्वरूपाची आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी मौजे वरंध येथे प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत भावे आरोग्य उपकेंद्राची निर्मिती आरोग्य विभागाकडून करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भावे आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीची दुरवस्था झाली असून अनेक आधुनिक सुविधांचा अभाव असल्याने येथील रूग्णांची गैरसोय होत आहे तसेच या ठिकाणी प्रसुती केली जात नसल्याने गरोदर मातांना नाईलाजाने बिरवाडी किंवा वरंध येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वा खासगी रूग्णालयात उपचार घ्यावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भावे आरोग्य उपकेंद्र इमारत सुस्थितीत करुन अद्यावत सुविधांसह आरोग्य सेवा मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पेंढरी (जि.गडचिरोली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात रूपांतर करण्याबाबत**

**(१८) * ८९७०० डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेंढरी (जि.गडचिरोली) हे गाव लोकसंख्येने मोठे असून येथील व जवळपासच्या गावातून येणाऱ्या लोकांना वैद्यकीय उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र वगळता इतर कोणत्याही प्रकारची वैद्यकीय सोयी सुविधा उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या लोकांना पेंढरीपासून किमान ५० किमी. अंतरावर धानोरा व एटापल्ली तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथील रुग्णांना चांगल्या प्रकारची वैद्यकीय सेवा मिळण्यासाठी पेंढरी येथे ग्रामीण रुग्णालयाची निर्मिती होणे अत्यावश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र पेंढरी येथे आलेल्या गंभीर रूग्णांना धानोरा ग्रामीण रूग्णालय व सामान्य रूग्णालयात संदर्भित केले जाते.

(३) व (४) शासन स्तरावर सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत जोड बृहत आराखडा करण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर मागणी जोड बृहत आराखडा अंतिम करताना निकषानुसार विचारात घेतली जाईल

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**धामणगांव बढे (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील शेतक-यांचे शेततळे व सिंचन विहिरीचे अनुदान थकीत असल्याबाबत**

**(१९) * ८६३०० श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणगांव बढे (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील ११ शेतकऱ्यांचे शेततळे व सिंचन विहिरीचे रूपये ६० लक्ष अनुदान मागील दोन वर्षांपासून थकीत असल्याची बाब दिनांक ०६ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त शेतक-यांचे माहे मार्च, २०१५ मध्ये मंजूर व बांधकाम झालेल्या शेततळे व सिंचन विहीरीचे अनुदान थकीत असल्याने सदर शेतक-यांची आर्थिकदृष्ट्या गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार शेतकऱ्यांना शेततळे व सिंचन विहीरीचे थकीत अनुदान त्वरित अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) अकुशलची अदायगी करण्यात आलेली असून झालेल्या कुशल कामाची अदायगीची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कामवारी नदी (ता.भिवंडी, जि.ठाणे) व चारणवाडी (वरसाळे) गारगाई (ता.वाडा, जि.पालघर) नदीवर कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधण्याबाबत**

**(२०) * ९०७६६ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कामवारी नदी (ता.भिवंडी, जि.ठाणे) व चारणवाडी (वरसाळे) गारगाई (ता.वाडा, जि.पालघर) नदीवर कोल्हापूर पध्दतीचे बंधारे मंजूर करुन गाळ काढण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.जलसंपदा राज्यमंत्री यांच्याकडे दिनांक ७ मार्च, २०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दोन्ही जिल्ह्यातील या नदीवर के.टी. बंधारा बांधणे अत्यंत आवश्यक असून तेथील शेतकरी व नागरिक यांच्या पिण्याच्या पाण्याची व शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याची गैरसोय टाळता येणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात मा. जलसंपदा राज्यमंत्री यांनी अधिक्षक अभियंता, जलसंधारण, ठाणे व पालघर यांना त्वरीत सर्वेक्षण करुन प्रस्ताव सादर करण्याचे

निर्देश देऊनही जलसंधारण विभाग,ठाणे व पालघर यांच्याकडून जाणीवपूर्वक विलंब करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबतची चौकशी करुन ठाणे जिल्ह्यातील कामवारी व पालघर जिल्ह्यातील चारणवाडी (वरसाळे) गारगाई नदीवर कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांची सर्वेक्षणाची कामे तातडीने मंजूर करुन प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.
(२) होय.

सदर ठिकाणी बंधारा बांधल्यास तेथील शेतकरी व नागरिक यांच्या पिण्याच्या पाण्याची व शेतीसाठी लागणा-या पाण्याची गैरसोय टाळता येणार आहे.
(३) या संदर्भात मा.जलसंपदा राज्यमंत्री यांनी त्वरीत सर्वेक्षण करुन प्रस्ताव सादर करण्याचे निदेश दिलेले आहेत. परंतू याबाबत विलंब झालेला नाही.
(४) (अ) कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, ठाणे यांच्याशी संबंधीत कामाची सद्यस्थिती :-

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील कामवारी नदीवर मौ.खातिवली, मौ.सैनिक वसाहत मौ.चाविंद्रा गोरसई येथे तीन के.टी.बंधारेचे सर्वेक्षण व अन्वेषणाचे अंदाजपत्रकास मंडळ कार्यालयामार्फत सर्वसाधारण मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता देण्यात आली असून निविदा कार्यवाही पुर्ण करुन सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यानंतर प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील चारणवाडी (वरसाळे) गारगाई नदीवर प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आले असून सदर ठिकाणी २ कोल्हापुर पध्दतीचे बंधारेसाठी सर्वेक्षण व अन्वेषणाचे अंदाजपत्रकास मान्यता घेण्यात येत आहे.

तसेच पालघर जिल्ह्यातील सोनाळे ता.वाडा येथे कोल्हापूर पध्दतीचे बंधाऱ्याचे सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम पुर्ण करण्यात आले असून प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(ब) कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, ठाणे यांच्याशी संबंधीत कामाची सद्यस्थिती :-

या विभागांतर्गत भिवंडी तालुक्यातील कामवारी नदीवर मौजे धामणगांव (कशिवली) व शेलार येथे बंधारे बांधण्याच्या कामाचा समावेश सन २०१७-१८ च्या आराखड्यात करण्यात आलेला आहे.सविस्तर सर्वेक्षण करुन अंदाजपत्रके शासनाच्या प्रचलित मापदंडात बसत असल्यास निधीच्या उपलब्धेनुसार काम करुन घेण्याचे नियोजन आहे.

(क) कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, पालघर यांच्याशी संबंधीत कामाची सद्यस्थिती :-

या विभागांतर्गत वरसाळे चारणवाडी येथे सिमेंट कॉंक्रीट नाला बांध बांधण्यात आलेला असून दि.१.५.२०१७ रोजी सदर बांध ग्रामपंचायतीच्या ताब्यात देण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गोंदिया जिल्हयातील 'गंगाबाई स्त्री रुग्णालयात' नवजात बालकांचा झालेला मृत्यू**

**(२१) * ८५३०४ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.संजय पुराम (आमगाव), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील गंगाबाई स्त्री रुग्णालयात ५० दिवसात ४५ नवजात बालकांचा मृत्यू झाल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास

आल्याने जिल्ह्याचे मा.पालकमंत्री यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे बालकांच्या झालेल्या मृत्यूमध्ये १८ बालके १५ दिवसांत दगावली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय

(४) असल्यास, त्यानुसार याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत व बालमृत्यू रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) बाई गंगाबाई स्त्री रुग्णालय गोंदिया या रुग्णालयामध्ये दि.०१.०४.२०१७ ते दि.१४.०५.२०१७ या कालावधीमध्ये भरती झालेल्या एकूण १९९ नवजात बालकांपैकी १८ नवजात बालकांचा मृत्यू झालेला आहे. तथापि, हे मृत्यू बालकांचे वजन कमी असणे, अपुरी वाढ, श्वसनाचा त्रास व गंभीर जंतुसंसर्ग या कारणांमुळे झालेले आहेत.

(३) प्रस्तुत प्रकरणी संस्थास्तरावरुन चौकशी करण्यात आली आहे.

(४) संस्थास्तरावर करण्यात आलेल्या चौकशीमध्ये कोणीही अधिकारी/ कर्मचारी दोषी आढळून आलेले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तळसंदे (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) ग्रामपंचायतमध्ये राजीव गांधी व इंदिरा गांधी घरकुल आवास योजनेमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२२) * ८७०३५ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळसंदे (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवक व लिपिक यांनी संगनमत करुन राजीव गांधी व इंदिरा गांधी घरकुल आवास योजनेमध्ये गैरव्यवहार करुन शासकीय निधीचा अपहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गैरव्यवहार करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबतचे निवेदन दिनांक ४ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार या प्रकरणी चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय.
(३) होय, संबंधीत ग्रामसेवक यांना निलंबीत करुन शिस्तभंगाची कारवाई का करण्यात येऊ नये या बाबत नोटीस देण्यात आली आहे, तर लिपिक यांना निलंबीत करुन त्यांच्या विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत गट विकास अधिकारी यांना सूचना दिल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात ५२१ जणांना स्वाइन फ्लूचा संसर्ग होऊन १०६ रुणांचा झालेला मृत्यू**

**(२३) * ८४९५४ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.सुधाकर**

**देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.अजित पवार (बारामती), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.चरण वाघमारे (तुमसर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्वाईन फ्लूमुळे माहे जानेवारी ते एप्रिल, २०१७ दरम्यान संसर्ग झालेल्या ५२१ जणांपैकी १०६ रुग्णांचा मृत्यू झाला असून, विशेषत: मुंबईत या वर्षी आतापर्यंत १७७ संशयित स्वाईन फ्लूग्रस्त रुग्णांची नोंद झाली असून यात सात जणांचा मृत्यू तर पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात ११ जणांचा मृत्यू झाला आहे तसेच राज्यातील ग्रामीण भागात स्वाईन फ्ल्यूच्या आजाराचे प्रमाण ३० वरुन ४० टक्क्यांवर पोहचले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे, नाशिक, औरंगाबाद व अहमदनगर मध्ये मृतांची संख्या लक्षणीय असल्याने राज्यातील स्वाईन फ्लूची लक्षणे ओळखून उपचार सुरु करण्यासाठी इंडियन मेडिकल (आयएमए) असोसिएशनने डॉक्टरांना दक्ष राहण्याच्या सूचना माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, स्वाईन फ्लू सदृश्य लक्षणे दिसणाऱ्या रुग्णांना विशेषत: अतिजोखीम असलेले रुग्ण आणि रुग्णालयात दाखल झालेल्या रुग्णांना त्यांच्या चाचणी अहवालाची प्रतिक्षा न करता तातडीने ‘ऑसेलटॅमिवीर’ (टॅमीफ्लू) औषध सुरु करा असे आयएमए चे राष्ट्रीय अध्यक्षांनी दिलेल्या सूचनेत नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्वाईन फ्लू च्या आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने कोणती तातडीची उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात १ जानेवारी ते ३० एप्रिल, २०१७ या कालावधीत इन्फल्यूएंझा ए एच१ एन१ आजाराचे ८४४ रुग्ण आढळले असून त्यापैकी १६५ जणांचा मृत्यू झाला आहे. याच कालावधीपर्यंत मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात २२ रुग्ण आढळले असून त्यापैकी १ जणांचा मृत्यू झाला आहे. तर पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरात ४९ जणांचा मृत्यू झाला आहे. २००९ नंतर या आजाराचा प्रसार शहरी भागासोबत ग्रामिण भागातही झाला आहे, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

इन्फ्ल्यूएंझा ए एच१ एन१ रुग्णांना लक्षणानुसार उपचार करण्यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना भारत सरकारने इन्फ्ल्यूएंझा ए एच१ एन१ च्या २००९ च्या साथीच्या वेळी दिल्या असून त्याचे पालन करण्यात येत आहे. या सूचना आयएमए वेळोवेळी आपल्या सदस्यांना देत असते.

(३) हे खरे आहे.

इन्फ्ल्यूएंझा ए एच१ एन१ संदर्भातील राष्ट्रीय मार्गदर्शक सूचनानुसार इन्फ्ल्यूएंझा ए एच१ एन१ संशयित रुग्णांना अ, ब, क, वर्गवारीनुसार उपचार देण्यात येतात, उपचार सुरु करण्यासाठी प्रयोगशाळा चाचणीची कोणतीही आवश्यकता नसते. या सुचना पाळण्याबाबत आयएमए या संस्थेने आपल्या सदस्यांना एप्रिल, २०१७ मध्ये सुचित केले हे खरे आहे.

(४) इन्फ्ल्यूएंझा ए एच१ एन१ प्रतिबंध व नियंत्रणासाठी खालील उपाययोजना राबविण्यात येतात :-

* फ्लू सदृश्य रुग्णांचे नियमित सर्वेक्षण.
* रुग्णांवर वर्गीकरणानुसार विनाविलंब उपचार.
* उपजिल्हा रुग्णालयात तसेच वैद्यकीय महाविद्यालयांच्या रुग्णालयात विलगीकरण कक्षाची स्थापना.
* उपचार सुविधा असणाऱ्या सर्व खाजगी रुग्णालयांना स्वाईन फल्यू उपचाराची मान्यता.
* राज्यातील ४ शासकीय प्रयोगशाळा मार्फत मोफत निदान सुविधा.

* रेलिगेअर आणि डॉ. लाल पॅथॉलॉजी लॅब शिवाय इतर खाजगी प्रयोगशाळांना मान्यता देण्यासाठी तज्ञ समित्यांची स्थापना.

* ऑसेलटॅमीवीरचा पुरेसा साठा.

* दुसऱ्या व तिसऱ्या तिमाहितील गरोदर मातांना तसेच उच्च रक्तदाब व मधुमेह असणाऱ्या रुग्णांना आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना फ्लू प्रतिबंधक लसीकरण.

* महाराष्ट्र साथरोग प्रतिबंध व नियंत्रण तांत्रिक समितीची स्थापना.

* अन्न व औषध प्रशासनामार्फत खाजगी औषध दुकांनामध्ये ऑसेलटॅमीवीर उपलब्ध ठेवण्यासाठी समन्वय.

* शासकीय आणि खाजगी डॉक्टरांच्या स्वाईन फ्लू कार्यशाळा.

* फ्लू प्रतिबंधांसाठी जनतेचे आरोग्य शिक्षण.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषदांना नियमित व वेळेवर अनुदान देण्याबाबत

**(२४) * ९०६१९ श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ कलम १५८ अन्वये जिल्हा परिषदांना देय असलेले भारीत मुद्रांक शुल्क अनुदानापोटी राज्यातील किती जिल्हा परिषदांना निधी मागील तीन वर्षात दिनांक ३१ मे, २०१७ रोजीपर्यंत उपलब्ध करुन दिला आहे,

(२) असल्यास, उर्वरित जिल्हा परिषदांना अनुदान न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, राज्यातील जिल्हा परिषदांना अनुदान उपलब्ध करुन न दिल्यामुळे तेथील विकास कामांवर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा परिषदांना नियमित व वेळेवर अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) सन २०१४-१५ मध्ये रु.६४० कोटी एवढे अनुदान सर्व जिल्हा परिषदांना वाटप करण्यांत आले.

सन २०१५-१६ मध्ये ३१ जिल्हा परिषदांना रु. ४३०.१० कोटी व महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाला थकबाकी पोटी रु.९१.९० कोटी असे एकूण रु.५२२ कोटी इतके अनुदान वाटप करण्यांत आले. तसेच सन २०१६-१७ मध्ये ३३ जिल्हा परिषदांना रु. ५४० कोटी एवढे अनुदान वितरीत करण्यात आले असून मागील तीन वर्षात ३१ मे,२०१७ पर्यंत रु. १६१०.१० कोटी जिल्हा परिषदांना उपलब्ध करून दिला आहे.

(२) महाराष्ट्र जीवन प्राधीकरणास रु. ९१.९० कोटी रक्कमेचे समायोजन करून देण्यात आल्याने काही जिल्हा परिषदांना अनुदान देता आले नाही.

(३) व (४) वित्त विभागाकडून प्राप्त अनुदान विहीत वेळेत नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत जिल्हा परिषदांना उपलब्ध करून देण्यांत येते.

-----------------

## रायगड (जि.रायगड) किल्ल्याच्या पायथ्याशी वनक्षेत्रात अवैध वृक्षतोड केल्याबाबत

**(२५) * ८७०६९ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मनोहर भोईर (उरण), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयात रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी लाकडी कोळसा निर्माण करण्यासाठी हजारो वृक्ष अवैधरित्या तोडल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून सदर परिसरामध्ये असणाऱ्या कोळसा माफियांच्या भट्ट्यांकडे वनखाते दुर्लक्ष करत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, गत वर्षी रायगड किल्ल्यावर १० हजार झाडे लावण्यात आली होती परंतु एक महिन्याच्या आतच पाण्याअभावी नष्ट झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली,
(४) तसेच, अवैध वृक्षतोड रोखण्यासाठी व सदर ठिकाणी नव्याने अधिक झाडे लावण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) रायगड किल्ला, भारतीय पुरातत्व सर्व्हेक्षण विभाग यांचे ताब्यात आहे. रायगड जिल्हयात रायगड किल्याच्या पायथ्याशी वनक्षेत्रात कोणत्याही प्रकारे अवैध वृक्षतोड आढळून आलेली नाही. रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी कोळसा भट्टया निदर्शनास आलेल्या नसून दि.१८.४.२०१७ रोजीचे दैनिक सामना वृत्तपत्रातील मथळाबाबत मौजे दरंडोली-वरेकोंड हे रायगड किल्ल्यापासून अंदाजे १४ कि.मी. अंतरावर कोळसा भट्टी लावत असल्याबाबत दिनांक १४.४.२०१७ रोजी प्राप्त बातमीचे अनुषंगाने कार्यवाही करुन मालकी क्षेत्रात आढळून आलेल्या कोळसा भट्टयांबाबत वेळीच गुन्हे नोंदविण्यात येऊन मालकी क्षेत्रातील कोळसा भट्टया नष्ट करुन कोळसा पोती जप्त करण्यात आलेली आहेत.
(२) व (३) सदरहू वृक्षलागवड वनविभाग़ाने केलेली नसून जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, रायगड-अलिबाग यांचेकडून प्राप्त माहितीनुसार कृषी विभागाकडून एकूण १६ हजार रोपांची लागवड जुलै, २०१६ मध्ये करण्यात आली असून माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये केलेल्या सर्वेक्षणात लागवड केलेल्या एकूण रोपांपैकी ७,१७५ रोपे जिवंत असल्याचे निदर्शनास आले. लागवड केलेल्या रोपांना पाणी देण्यासाठी व संरक्षणासाठी गडावरील स्थानिक मजूरांची उपलब्धता व स्थानिक स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य प्राप्त झाले नाही. त्यामुळे उर्वरित रोपांची पाण्याअभावी मर झाली आहे.
(४) व (५) रायगड किल्ल्याचे परिसरात वृक्षतोड रोखण्यासाठी वेळोवेळी वनकर्मचारी फिरती करतात व रात्री गस्ती करुन गैरप्रकार निदर्शनास येताच वेळीच गुन्हे नोंदविण्यात येतात. तसेच अवैध वृक्षतोड अनधिकृत कोळसा भट्टया होऊ नयेत यासाठी स्थानिक पोलीस यंत्रणेची मदत घेतली जाते. रायगड परिसरातील वनक्षेत्रातील अवैध वृक्षतोड रोखण्यासाठी वनविभागामार्फत सर्वोतोपरी प्रयत्न केले जात असून सदर ठिकाणी नव्याने अधिक झाडे लावण्यासाठी रोहा

वनविभागामार्फत सन २०१७ च्या पावसाळयात ४ कोटी वृक्ष लागवड योजनातंर्गत संयुक्त वनव्यवस्थापन समिती कोतुर्डे, पाचाड, मांघरुण तसेच या परिसरातील ग्रामपंचायत कोतुर्डे, निजामपूर, पाचाड, पुनाडे, सावरट, सांदोशी, वाळसुरे व इतर यंत्रणांनी एकूण एकंदर ५१८५ रोपांची लागवड चालू पावसाळयात केली आहे.

-----------------

## टाळंबा (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) पाटबंधारे प्रकल्पांतर्गत बुडीत क्षेत्रातील विस्थापितांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(२६) * ८५७२७ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाळंबा (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) पाटबंधारे प्रकल्पांतर्गत बुडीत क्षेत्रातील विस्थापितांचे अदयाप पुनर्वसन झाले नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रात समाविष्ट असलेल्या गावांमधील आठ एकरपेक्षा जास्त जमीन असलेल्या शेतक-यांना जमीन विक्री, हस्तांतरण, खातेफोड, धडेवाटप आदीसाठी शासनाने निर्बंध घातले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या या जाचक निर्बंधामुळे शेतकऱ्यांची गैरसोय होत असून परिसराचा विकासही थांबला असल्याने जमीन व्रिकी, हस्तांतरण, खातेफोड, धडेवाटप आदीसाठी शासनाने घातलेले निर्बंध त्वरित उठविण्याबाबतची मागणी शेतक-यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निर्बधांचा फेरविचार करुन तात्काळ उठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अशंत: खरे आहे.

(२) होय.

टाळंबा (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) पाटबंधारे प्रकल्पातील, कुडाळ तालुक्यातील ६० गावे व सावंतवाडी तालुक्यातील ४ गावे मिळून एकूण ६४ गावे लाभपात्र क्षेत्रातील असून कलम १२(२) चे निर्बंध घालणेत आलेले आहेत.

(३) व (४) होय.

महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक २१ जुलै १९८८ नुसार आठ एकर वरील लाभक्षेत्रातील मागणी करणा-या शेतक-यांना आठ एकर क्षेत्र कायम ठेऊन उर्वरित क्षेत्राच्या खरेदी-विक्री व्यवहाराला नाहरकत दाखले पुनर्वसन खात्याकडून दिले जात आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## येरवडा (जि.पुणे) येथील पंडित जवाहरलाल नेहरू उद्योग केंद्रातील बालगुन्हेगार पळून गेल्याबाबत

**(२७) * ९०३१९ श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरवडा (जि.पुणे) येथील पंडित जवाहरलाल नेहरू उद्योग केंद्राचा दरवाजा तोडून दिनांक १६ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास आठ बालगुन्हेगार पळून गेले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बालगुन्हेगारांवर जबरी चोरी, घरफोडी, लुटमार, विनयभंग, असे गंभीर गुन्हे दाखल होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येरवडा, पुणे येथील पंडित जवाहरलाल नेहरू उद्योग केंद्रात दाखल असलेली मुले पळून जाण्याचे व लैंगिक अत्याचार होण्याच्या घटना वारंवार घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) दि. १७.६.२०१७ रोजी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पुणे व परिविक्षा अधिकारी यांनी पंडित जवाहरलाल नेहरू उद्योग केंद्र, येरवडा या संस्थेस भेट देऊन चौकशी केली आहे.

(५) अंधाराचा फायदा घेऊन, कर्मचाऱ्यांना दमदाटी करून, दरवाजा तोडून, लाकडाच्या दंडुक्याचा वापर करून बालकांनी समुहाने पलायन केले असल्याचे उक्त चौकशीत प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे.

याबाबत संस्थेने कर्तव्यावर कार्यरत तीन काळजी वाहकांकडून खुलासा मागविला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पिंपळगाव खांड (ता.अकोले, जि.अहमदनगर) धरणाचे काम निधीअभावी बंद असल्याबाबत**

**(२८) * ८७८५७ श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगाव खांड (ता.अकोले, जि.अहमदनगर) धरणाचे काम गेल्या दोन वर्षापासून निधीअभावी बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणाच्या कामास सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी तालुक्यातील लोकप्रतिनिधींनी मा.वित्त मंत्री यांच्याकडे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकल्पास रुपये १०१०५.०० लक्ष किंमतीस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठीचे अंदाजपत्रकास व्यय अग्रक्रम समितीच्या दिनांक ३१.०५.२०१७ रोजी झालेल्या बैठकीत सुप्रमा देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. अद्याप सुप्रमा आदेश प्रतिक्षेत आहे.

सदर प्रकल्पास आदिवासी उपयोजनेअंतर्गत सन २०१६-१७ साठी शासनाच्या दिनांक ३०.०३.२०१७ च्या आदेशानुसार रुपये ३३९.१४ लक्ष अनुदान उपलब्ध

झालेले आहे. तसेच सन २०१६-१७ चा रुपये ५७६.०४ लक्ष निधी शिल्लक असून सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी रुपये २७८५.०० लक्ष निधीची तरतूद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोल्हापूरातील छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयाचा नॅशनल कॅन्सर ग्रिडमध्ये समावेश केल्याबाबत**

**(२९) * ९०१५५ श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूरातील छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयाचा नॅशनल कॅन्सर ग्रिडमध्ये समावेश झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयात कर्करोग रुग्णांवर कोणत्या प्रकारची उपचार पध्दती करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, याकरिता रुग्णालयात कोणती नवीन यंत्रसामुग्री घेण्यात आली व त्याकरिता तज्ञांची निवड करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, याबाबतची सद्‌यस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) नॅशनल कॅन्सर ग्रिड अंतर्गत छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर या संस्थेमध्ये उपचारार्थ येणा-या कर्करोगग्रस्त रुग्णांवर टाटा मेमोरीयल कॅन्सर हॉस्पिटल, मुंबई येथील तज्ञांशी सल्लामसलत करुन उपचारांचे नियंत्रण व उपचार करण्यात येतील. तसेच आवश्यकता भासल्यास टाटा मेमोरीयल हॉस्पिटल, मुंबई येथील तज्ञ डॉक्टर छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर येथे येऊन रुग्णांच्या शस्त्रक्रिया करणार असल्याने, कर्करोगग्रस्त रुग्णांना उत्तम प्रकारची उपचार सुविधा उपलब्ध होणार आहे.

(३) उपलब्ध यंत्रसामुग्री व मनुष्यबळाच्या साहाय्याने कर्करोगाचे उपचार करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोमपूर (ता.सटाणा, जि.नाशिक) ग्रामपंचायतीच्या ग्रामनिधीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(३०) * ८६५५५ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोमपूर (ता.सटाणा, जि.नाशिक) ग्रामपंचायतीमध्ये ग्रामनिधी व ज.रो.यो. निधीमध्ये सन २०१६-१७ मध्ये १७ लाख रुपयांचा अपहार झाल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी नाशिक जिल्हा परिषदेचे विस्तार अधिकारी (पंचायत) यांच्याकडे दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार निधीचा अपहार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

सोमपूर ग्रामपंचायतीमध्ये ग्रामनिधी/पाणी पुरवठा व १४ वा वित्त आयोगाच्या निधीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांनी दिनांक २८/०९/२०१६ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बागलाण, जि. नाशिक यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे.

(२) सदर प्रकरणी जिल्हा परिषद स्तरावरुन चौकशी करण्यात आली असून सोमपूर ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांनी संशयीत आर्थिक अनियमितता केल्याचे आढळून आले आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी दोषी असलेले श्री. पुरुषोत्तम विठोबा शेलार, ग्रामसेवक, ग्रामपंचायत, सोमपूर यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांच्या दिनांक २७/०२/२०१७ च्या कार्यालयीन आदेशान्वये निलंबित करण्यात आलेले आहे. तसेच या प्रकरणी दोषी असलेले सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांनी देखील कर्तव्यात कसूर केल्याने ग्रामपंचायत लेखासंहिता, २०११ व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ३९ (१) अन्वये त्यांच्या अपात्रतेबाबत कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. तसेच

दिनांक ५/०६/२०१७ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बागलाण यांनी लेखी पत्रान्वये सदर प्रकरणी गुन्हा नोंद होणेबाबत पोलीस निरिक्षक, पोलीस ठाणे, जायखेडा यांना कळविले आहे.

-----------------

**धुळे जिल्हा सर्वोपचार रुग्णालयात निवासी डॉक्टरांना झालेली मारहाण**

**(३१) * ८५२४४ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हा सर्वोपचार रुग्णालयात मोटार सायकल अपघातात जखमी झालेल्या तरुणाला उपचाराकरता रुग्णालयात दाखल केल्यानंतर उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाल्यामुळे मृत व्यक्तीच्या नातेवाईकांनी निवासी डॉक्टर रोहन मामुनकर यांना मारहाण केल्याची घटना दिनांक १४ मार्च २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेच्या विरोधात व शासनाने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता तातडीने करण्याकरता सलग २ ते ३ दिवस डॉक्टरांच्या संघटनेने कामबंद आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात माहे मार्च ते जून या कालावधीत जिल्हा वा शासकीय रुग्णालयासह खासगी रुग्णालयात रुग्णांच्या नातेवाईकांनी डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर हल्ला करुन रुग्णालयाची दुरवस्था करण्याच्या एकूण किती घटना घडल्या असून अशा घटना घडू नयेत यासाठी रुग्णालयात पुरेसा पोलिस बंदोबस्त व हल्लेखोरांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे. सदर घटना दिनांक १२ मार्च,२०१७ रोजी घडलेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सन २०१७ मध्ये जून अखेर डॉक्टरांवरील हल्ल्यांप्रकरणी एकूण ५९ गुन्हे दाखल झाले आहेत.

शासकीय आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेची वैद्यकीय महाविद्यालये आणि संलग्नित रुग्णालयांच्या सुरक्षेसाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिंधुदूर्ग जिल्हयात संसर्गजन्य रोग संशोधन प्रयोगशाळा उभारण्याबाबत**

**(३२) * ८६७८५ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्हयात संसर्गजन्य रोग संशोधन प्रयोगशाळा उभारण्याचा निर्णय मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी ओरोस (जि.सिंधुदूर्ग) येथे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घोषित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संसर्गजन्य रोग संशोधन प्रयोग शाळेचे सर्वसाधारण स्वरुप काय असून यासाठी किती खर्च अपेक्षित आहे,

(३) असल्यास, सदरहू संसर्गजन्य रोग संशोधन प्रयोगशाळा कार्यान्वीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**तिरोडा (जि.गोंदिया) तालुक्यात मनरेगा योजनेतंर्गत करण्यात आलेल्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(३३) * ८५३४४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिरोडा (जि.गोंदिया) तालुक्यात मनरेगाअंतर्गत मोठया प्रमाणात काम सुरू असून या कामावर देखरेख करण्यासाठी नऊ कंत्राटी अभियंताची नेमणूक रोहयो अंतर्गत करण्यात आली, या कंत्राटी अभियंतानी काम करणा-या मजूरांना मजूरी वाढवून देण्याचे आमिष दाखवून दोनशे ते पाचशे रूपये या प्रमाणे हजारो रूपये वसूल केले आणि प्रत्यक्षात कमी काम असतांना सुध्दा जास्त काम केल्याचे मोजमाप पुस्तिकेत नोंद करून शासनाची लाखो रूपयांची फसवणूक केल्याची माहिती दिनांक १६ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात तक्रार होताच तिरोडा पंचायत समितीचे सर्वंग विकास अधिकारी यांनी संबंधित सर्व नऊ अभियंताना नोटीस देवून खुलासा मागितला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

याबाबत तक्रार प्राप्त नाही. परंतु दि.०७/०६/२०१७ रोजी दैनिक लोकमत हॅलो गोंदिया परसवाडा लोकमत न्यूजमध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झालेली आहे.

(२) व (३) दैनिक लोकमत मध्ये बातमी प्रसिध्द झाल्यामुळे संबंधित कंत्राटी तांत्रिक अभियंता यांना नोटिस देवून खुलासा मागितला होता. संबंधित कर्मचाऱ्यांकडून खुलासा प्राप्त झाल्यावर सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी केली असता त्यामध्ये तथ्य आढळून आलेले नाही. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज श्रीक्षेत्र मोझरी (जि.अमरावती) विकास आराखडयांतर्गत नव्याने प्रस्तावित करावयाच्या कामास मान्यता मिळण्याबाबत**

**(३४) * ८८०५२ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज श्रीक्षेत्र मोझरी विकास आराखडयांतर्गत मोझरी विकास आराखडा टप्पा-२ मध्ये नव्याने प्रस्तावित करावयाच्या कामास मान्यता मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांच्याकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याअनुषंगाने मोझरी आराखडा टप्पा-२ अंतर्गत तपशिलवार अंदाजपत्रक मागवून त्यास मान्यता व निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) नाही. तथापि, मोझरी विकास आराखड्यामध्ये नियोजित असलेल्या कामांव्यतिरिक्त वाढीव कामांचा समावेश करण्याबाबतचे प्रस्ताव जिल्हाधिकारी, अमरावती, विभागीय आयुक्त, अमरावती विभाग व इतर लोकप्रतिनिधी यांच्याकडून शासनास प्राप्त झाले आहेत.

(२) व (३) शासनास प्राप्त झालेले प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहेत.

-----------------

**पांढरकवडा (जि.यवतमाळ) वन विभागात करण्यात आलेल्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(३५) * ८८६२८ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) वन विभागात रोहयो अंतर्गत सन २०१६ मध्ये ठिकठिकाणी करण्यात आलेली कामे मोजमाप न करता मूल्यांकन होण्यापूर्वीच

देयके अदा करण्यात आली असून जलयुक्त शिवार योजने अंतर्गत अनगड दगडी बांधाची झालेली कामेही अत्यंत निकृष्ट दर्जाची झाली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोजमाप पुस्तिकेतील मापदंड आणि मोक्यावरील अनगड दगडी बांध यामध्ये बरीचशी तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार गैरव्यवहार करुन देयके घेणाऱ्यांवर व अनगड दगडी बांधाची कामे निकृष्ट दर्जाचे करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

पांढरकवडा वन विभागात रोहयो अंतर्गत सन २०१६ मध्ये कोणतीही कामे करण्यात आलेली नाहीत. जलयुक्त शिवार अभियान सन २०१६ मध्ये अनघड दगडी बांधाची कामे मजुरामार्फत पुर्ण करण्यात आली. मोका पाहणी नुसार वनपालांनी मोजमापाच्या नोंदी मोजमाप पुस्तिकेत नोंदविल्या नंतर वरिष्ठांनी खात्री केली असता मोजमापामध्ये तफावत आढळली नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यात डेंग्यु रोगाचा झालेला प्रादुर्भाव

**(३६) * ८७७२७ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्हयातील शहापूर शहरासह संपूर्ण तालुक्यात डेंग्यु रोगाचा मोठया प्रमाणात प्रार्दुभाव झाल्याचे माहे मे, २०१७ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार डेंग्यु रोगास प्रतिबंध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

शहापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, टेंभा अंतर्गत धामणी गावात तापरुग्ण संख्येत वाढ झाल्याने ताप उद्रेक घोषित करण्यात आला.

(२) होय.

मे, २०१७ मध्ये पाण्याच्या कमतरतेमुळे पाणी साठवून ठेवण्याच्या जनतेच्या प्रवृत्तीमुळे एडिस डास आळया वाढल्याने डेंग्युचे रुग्ण आढळून आले आहेत.

(३) धामणी गावात ४४९ लोकसंख्येत ८४ घरे असून, २७ घरात एडिस डास आळया आढळून आल्या. या गावात या कालावधीत एकूण ६२ ताप रुग्ण आढळून आले. त्यापैकी संशयीत ६ तापरुग्णांचे रक्तजल नमुने डेंग्युसाठी तपासण्यात आले. सदर सर्व ६ नमुने डेंग्यु दुषित आढळून आले.

धामणी गावात तापरुग्ण संख्येत वाढ झाल्याने तात्काळ साथरोग प्रतिंबधात्मक व उपचारात्मक कार्यवाही अंतर्गत या गावातील एकूण ३८९ पाणीसाठे तपासण्यात आले. त्यापैकी ४० पाणीसाठ्यांमध्ये एडिस डास आळया आढळून आल्याने, ते सर्व दुषित पाणीसाठे रिकामे करण्यात आले. जनतेस आरोग्य शिक्षण देण्यात आले. तसेच ग्रामपंचायतीमार्फत धुर फवारणी करण्यात आली. त्यामुळे धामणी गावातील साथ त्वरीत कार्यवाही केल्यामुळे आटोक्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जैताणे (ता.साक्री, जि.धुळे) येथे ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्याबाबत**

**(३७) * ८५२७३ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील माळमाथा परिसराचा विस्तार व वाढती लोकसंख्या विचारात घेऊन जैताणे येथे सन २००८ मध्ये ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रुग्णालय अद्‌याप उभारण्यात आले नसल्याने जैताणे-निजामपूरसह संपूर्ण माळमाथा परिसरातील नागरीकांना वैद्‌यकीय उपचारापासून वंचीत राहवे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जैताणे येथील मंजूर ग्रामीण रुग्णालय तातडीने उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

शासन निर्णय दिनांक ४ जून, २००८ अन्वये निजामपूर जैताने येथे ग्रामीण रुग्णालय मंजुर करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

सद्यस्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीमध्ये ग्रामीण रुग्णालयाचे कामकाज सुरु आहे. त्यामुळे रुग्णांना वैद्यकीय उपचारापासून वंचित राहवे लागत नाही.

(३) ग्रामीण रुग्णालय जैताणे साठी मंजुर झालेली जागा न्याय प्रविष्ठ असल्याने सदर जागेवर बांधकाम करता येत नाही. सदर ग्रामीण रुग्णालयासाठी पर्यायी जागा उपलब्ध करुन घेण्यासाठी जिल्हाधिकारी धुळे व ग्रामपंचायत जैताने यांच्याकडे मागणी करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पंडीत दिनदयाळ उपाध्याय घरकुल खरेदी अर्थसहाय्य योजनेचे अनुदान वाढविण्याबाबत

**(३८) * ८६४१४ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंडीत दिनदयाळ उपाध्याय घरकुल खरेदी अर्थसहाय्य योजनेअंतर्गत कोल्हापूर जिल्हयामधून एकही प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे प्राप्त झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील ७५० कुटुंबांकडे घरे बांधण्यासाठी जागा उपलब्ध नसून या योजनेत मिळणारे ५० हजार रुपयांचे अनुदान अत्यल्प असल्याने या योजनेला प्रतिसाद मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनेचे अनुदान वाढविण्याबाबत व घरे बांधण्यासाठी शासकीय जागा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत शिरोळ गटाकडून प्राप्त झालेले ०५ लाभार्थीचे प्रस्ताव राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालयाकडे सादर करण्यात आले आहे
(२) नाही.
(३) शासनाने दि. ३० डिसेंबर, २०१५ रोजीचा “पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना “शासन निर्णय अधिक्रमित करुन सुधारित शासन निर्णय दि. १४ जुलै, २०१७ रोजी निर्गमित केला आहे. या शासन निर्णयानुसार योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना संबंधिताना देण्यात आल्या आहेत.
तसेच, सुधारित शासन निर्णयान्वये योजनेची अंमलबजावणी नुकतीच सुरू झाली आहे. त्यामुळे सद्यस्थितीत जागा खरेदीसाठी देण्यात येणा-या अनुदानामध्ये कोणतीही वाढ करण्याची बाब शासनाच्या विचारधीन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कराड (जि.सातारा) तालुक्यातील वेणूताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयात रिक्त असलेल्या पदांबाबत

**(३९) * ९००४० श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कराड (जि.सातारा) तालुक्यातील वेणूताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयामध्ये डॉक्टर आणि तंत्रज्ञांची पदे रिक्त असल्यामुळे ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना खाजगी रुग्णालयांमध्ये वैद्यकीय उपचारासाठी जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयात अपुऱ्या प्रशिक्षित मनुष्यबळाअभावी सीटी स्कॅन, सोनोग्राफी, ईसीजी इत्यादी वैद्यकीय यंत्रणा वर्षभरापासून बंद आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनदेखील या रिक्त जागा भरण्यासह इतर सोयीसुविधा पुरविण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या रुग्णालयातील रिक्त पदांसह इतर सोयीसुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

स्व. सौ वेणूताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालय येथे वैद्यकीय अधिक्षकाचे १ पद मंजूर असून सदर पद भरलेले आहे.वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.५४००/-) संवर्गाची एकूण १२ पदे मंजूर असून त्यापैकी ९ पदे भरलेली आहेत. सदर रुग्णालयात तांत्रीक संवर्गाची १७ पदे मंजूर असून त्यापैकी ११ पदे भरलेली व ६ पदे रिक्त आहेत.

उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून रुग्णांना आवश्यक ती रुग्णसेवा उपलब्ध करुन देण्यात येते.

(२) हे अंशत: खरे आहे.
सदर रुग्णालयात क्ष-किरणतंत्रज्ञ-२, प्रयोगशाळा तंत्रज्ञ-१, रक्तपेढी तंत्रज्ञ-१, ईसीजी तंत्रज्ञ-१ कार्यरत असून सदर रुग्णालयात रेडीओलॉजीस्ट व सोनोलॉजीस्टचे पद मंजूर नाही.

जिल्हा रुग्णालयातील सीटी स्कॅन मशीन दि.१६.११.२०१३ रोजी या रुग्णालयात स्थलांतरीत करण्यात आले आहे. तथापि, सदर मशीन इन्स्टॉल करण्यात आलेली नाही. तसेच सोनोग्राफी मशिन नादुरुस्त असल्याने आयपीएचएस अंतर्गत सोनाग्राफी सेवा आऊट सोर्सींगद्वारे उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. ईसीजी सुविधा कार्यान्वित आहे.

(३) व (४) वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे रु.५४००/-) संवर्गाची रिक्त पदे Walk in Interview च्या माध्यमातून जिल्हाधिकारी यांच्या स्तरावरुन भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

तसेच गट-क संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एपीएमसी मार्केटमधील जीवनावश्यक वस्तुंना जीएसटी करापासून सवलत देण्याबाबत

**(४०) * ८६१७७ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एपीएमसी मार्केटमध्ये आलेल्या हळद, बेदाणा, सोयाबीन, मिरची या जीवनावश्यक वस्तुंना जीएसटी मधुन वगळण्यात यावे आणि बाजार समिती सेवाकर आणी उपकर मुक्त करावी इ. मागण्यांसाठी नवी मुंबई बाजार समितीतील धान्य आणि मसाला मार्केटमधील व्यापाऱ्यांनी दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास बंद पाळला होता, हे खरे आहे काय,

(२) तसेच शेतकरी खते, बियाणे, पाणी यावर कर भरुन आता शेती उत्पादनावर कर लावण्यात आल्यामुळे शेतक-यांवर आर्थिक भार पडणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, व्यापाऱ्यांनी केलेल्या मागण्यांचे स्वरुप काय आहे व त्यानुसार जीवनावश्यक वस्तुंना जीएसटी करापासून सवलत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

(२) नाही. महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ तसेच केंद्रिय वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ ची अंमलबजावणी दिनांक १ जुलै, २०१७ पासून सुरु झाली आहे. उपरोक्त दोन्ही कायद्यांतर्गत शेतजमीन लागवाडीमधील उत्पादित मालाचा पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यास करापासून सूट देण्यात आली आहे. खते

तसेच बियाणे यावर कमीत कमी दराने, म्हणजेच एकत्रित ५% दराने कराची आकारणी असून, पाणी कर माफ आहे. शेतीमधून उत्पादीत होणारे उत्पादने जसे गहू, ज्वारी, तांदूळ तसेच ताजा भाजीपाला, फळे इ.कर लावण्यात आलेला नाही.

(३) व्यापाऱ्यांनी हळद, बेदाणे, सोयाबीन, मिरची इ.वस्तूंना जीएसटी करातून वगळण्याची मागणी केली आहे. याबाबत वस्तू व सेवा कर प्रणालींतर्गत वस्तूवरील कराचे दर शिफारस करण्याचे अधिकार वस्तू व सेवा कर परिषदेकडे आहेत. परिषदेने शिफारस केलेल्या कराच्या दराप्रमाणेच राज्याने वस्तूवरील कराचे दर निश्चित केले आहेत.

(४) लागू नाही.

-----------------

## पंचायत समिती चामोर्शी (जि.गडचिरोली) अंतर्गत ग्रामपंचायत तळोधी (मो.) येथील प्राथमिक शाळेच्या दुरुस्तीच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(४१) * ८५९१८ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील पंचायत समिती चामोर्शी अंतर्गत ग्रामपंचायत तळोधी (मो) येथील प्राथमिक शाळेच्या दुरुस्तीच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबतची तक्रार तेथील ग्रामस्थांनी दिनांक २५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी गडचिरोली व अप्पर सचिव, ग्रामविकास विभाग यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार सदर शाळेच्या दुरुस्तीच्या कामात गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय, याबाबत विभागीय आयुक्त, नागपूर यांच्याकडे तक्रार प्राप्त झालेली आहे. सदर प्रकरणी जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, चामोर्शी यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली. सदर तक्रार कामाच्या

गुणवत्तेबाबत नसून विविदेबाबत असल्यामुळे सदर प्रकरणी संवर्ग विकास अधिकारी व विस्तार अधिकारी, पंचायत समिती, चामोर्शी यांच्या मार्फतही सखोल चौकशी करण्यात आली असून सदर चौकशीत गैरव्यवहार झाला नसल्याचे स्पष्ट केलेले होते. सबब, सदर तक्रारीबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, गडचिरोली यांनी स्वत: चौकशी करुन चौकशी अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**धुळे जिल्हयातील कुलस्वामिनी धर्मदाईदेवी मंदिर तिर्थक्षेत्राच्या परिसरात विकासकामे करण्यासाठी निधी मिळण्याबाबत**

**(४२) * ९०२५२ श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील कुलस्वामिनी धर्मदाईदेवी मंदिर या ब वर्ग तिर्थक्षेत्राच्या परिसरात विकासकामे करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.पालकमंत्री यांच्याकडे केली असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीच्या अनुषंगाने सदर तिर्थक्षेत्राच्या परिसरात विकासकामे करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) धुळे जिल्हयात कुलस्वामिनी धर्मदाईदेवी मंदिर हे तिर्थक्षेत्र नाही. धुळे जिल्हयातील साक्री तालुक्यातील म्हसदी, पिंपळनेर, ककाणी या तीन ठिकाणी धनदाईदेवी मंदिर आहे. त्यापैकी म्हसदी येथील धनदाई देवी मंदिरास दि. १३ डिसेंबर, २०१६ रोजीच्या राज्य निकष समितीच्या बैठकीत शासनाने “ब” वर्ग दर्जा दिला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हवेली (जि.पुणे) तालुक्यातील खामगाव मावळ, मोगरवाडी येथील पुलाची झालेली दुरवस्था

**(४३) * ८६३११ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवेली (जि.पुणे) तालुक्यातील खामगाव मावळ, मोगरवाडी ०/०० ते २/६५० ग्रा.मा.३७७ मधील ०/६०० चेनेज मधील पुल अत्यंत धोकादायक स्थितीत असल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदरहू ठिकाणी संबंधीत जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत केलेल्या पाहणीमध्ये आणि गावांच्या निवेदनावरून ही बाब निदर्शनास आली असून त्याबाबत योग्यती कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधितांना केल्या असतांनादेखील अद्याप कोणतीही कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर पुल दुरुस्त करण्याबाबत व या कामात दिरंगाई करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदरचा पूल धोकादायक स्थितीत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर लगेच सदर पुलाच्या स्तंभाच्या कॉक्रीट दुरुस्तीचे काम करण्यात आलेले आहे.

तसेच ०/६०० साखळीमध्ये पूल बांधण्याचे रु.७५.०० लक्षचे काम जिल्हा वार्षिक योजना ३०५४ ग्रामीण रस्ते विकास कार्यक्रम या लेखाशिर्षांतर्गत प्रस्तावित करण्यात आले आहे.

(३) जिल्हा परिषदेमार्फत पुलाची तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली असल्याने व नवीन पुलाचे काम प्रस्तावित केले असल्याने चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेकडे अंगणवाडी बांधकामाची रक्कम थकीत असल्याबाबत

**(४४) * ८५८६४ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील १५७१ अंगणवाड्यांना स्वतःच्या इमारती नसल्याने त्या भाड्याच्या जागेत, ग्रामपंचायत किंवा मंदिरात भरविले जात असल्याची बाब दिनांक २५ मे २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाडी बांधकामाचे २५ कोटी ८५ लाख रूपये बुलढाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेकडे थकीत असल्याने अंगणवाडीतील बालकांच्या शिक्षणाची गैरसोय होऊन त्यांना उघड्यावर शिक्षण घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार बुलढाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेकडे थकीत रक्कम संबंधीत विभागास मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) अंगणवाडी इमारत बांधकामासाठी बुलढाणा जिल्हापरिषदेस सन २०१०-११ व २०११-१२ मध्ये उपलब्ध करुन दिलेला निधी रुपये २५.८५ कोटी बुलढाणा जिल्हा केंद्रिय सहकारी बँकेमध्ये जमा करण्यात आला होता. परंतू सदर कालावधीत रिझर्व बँकेने बँकेवर निर्बंध घातल्यामुळे सदर रक्कम बँकेमध्ये जमा आहे. बँकेचे कामकाज सुरळीत सुरु झाल्यानंतर सदर रक्कम बँकेकडुन जिल्हापरिषदेस परत करण्यात येणार आहे. जिल्हयामध्ये २५७७ अंगणवाडी केंद्र व १४१ मिनी अंगणवाडी केंद्रे अशी एकुण २७१८ अंगणवाडी केंद्र मंजुर असुन, त्यापैकी ११४७ अंगणवाडी केंद्र स्वत:च्या इमारतीमध्ये व उर्वरीत १५७१ अंगणवाडी केंद्र जि.प. शाळेत, ग्रामपंचायत, समाज मंदीर व भाड्याच्या इमारतीमध्ये भरविल्या जातात.

-----------------

**औरंगाबाद, फुलंब्री आणि गंगापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यातील शेतकऱ्यांना रोजगार हमी योजनेतंर्गत मिळणाऱ्या विहीरमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(४५) * ८५३३५ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद, फुलंब्री आणि गंगापूर (जि.औरंगाबाद) या तालुक्यातील शेतकऱ्यांना रोजगार हमी योजनेतून विहीर काढून देण्याच्या बाबतीत हजारो लाभार्थी शेतकऱ्यांकडून करोडो रुपये ग्रामसेवकापासून ते गटविकास अधिकाऱ्यापर्यंत घेण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्यानंतर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी गटविकास अधिकारी यांना निलंबित केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी संबंधितांवर कारवाई करण्याबाबत दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.रोजगार हमी मंत्री यांचेकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी वृत्तपत्रात दुरचित्रवाणीवर प्रसारित झालेल्या बातमी संदर्भाने विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद औरंगाबाद यांना चौकशीसाठी आदेशित केले होते. त्या प्रमाणे चौकशी पुर्ण झाली असून चौकशी अहवाल विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना सादर केला आहे.त्यावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) चौकशी अहवालाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त यांचेकडून प्राप्त होणाऱ्या अहवालाप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई कॅन्सर रजिस्ट्रीने केलेल्या सर्व्हेक्षणानुसार तोंडाच्या कॅन्सरचे प्रमाण वाढल्याबाबत

**(४६) * ८५०१९ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई कॅन्सर रजिस्ट्रीने केलेल्या सर्व्हेक्षणानुसार तंबाखूसह तंबाखुजन्य पदार्थाच्या वाढत्या सेवनामुळे राज्यातील ग्रामीण भागात महिलांमध्ये व तरुणांमध्ये तोंडाच्या कॅन्सरचे प्रमाण वाढल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिगारेट, तंबाखूजन्य पदार्थ आणि गुटख्याच्या सेवनावर कायदयाच्या स्वरुपात शासनाने नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला तरी त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात तंबाखूजन्य पदार्थाच्या वाढत्या प्रसार व प्रचाराला आळा घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) राज्यात तंबाखुजन्य पदार्थाच्या वाढत्या प्रसार व प्रचाराला आळा घालण्याकरिता शासनामार्फत खालील उपाययोजना करण्यात येत आहेत :-

* सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम हा ३४ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे.

* सिगारेट व अन्य तंबाखूजन्य उत्पादने कायदा (COTPA), २००३ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समन्वय समितीची स्थापना करण्यात आली आहे.

* जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समन्वयक समिती स्थापन करण्यात आल्या आहेत.

* जिल्हास्तरीय समन्वयक समितीने स्थापन केलेल्या तंबाखू विरोधी पथकामार्फत COTPA कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कार्यवाही करुन दंड वसूल करण्यात येतो.

* राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत तंबाखू मुक्त शाळा व संस्था अभियान राबविले जाते.

* जनजागृतीसाठी विविध प्रकारचे उपक्रम (उदा. रेडीओ जिंगल्स, दूरदर्शन वरील कार्यक्रम इ.) करण्यात येतात.

* कर्करोगाचे वेळेत निदान व उपचार होण्यासाठी कर्करोग तपासणी शिबीरे घेण्यात येतात.

* प्रत्येक जिल्हा रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयात तंबाखू मुक्ती केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुल्हेर (ता.बागलाण, जि.नाशिक) येथे ग्रामीण रुग्णालय सुरु करण्याबाबत**

**(४७) * ८७११० श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुल्हेर (ता.बागलाण, जि.नाशिक) येथील आदिवासी भागात दिनांक २२ जुलै, २००९ रोजी वा त्यासुमारास नाशिक (खान्देश) विकास पॅकेज अंतर्गत शासनाने मंजूर केलेल्या ग्रामीण रुग्णालयाचे काम ८ वर्षे होऊनही अद्याप सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी ग्रामीण रुग्णालय नसल्याने आदिवासी बांधवांना सटाणा किंवा नामपूर येथे ५० कि.मी. अंतरावर वैद्यकीय उपचारासाठी जावे लागते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू ग्रामीण रुग्णालय सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री व प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडे दिनांक ११ मार्च, २०१५ रोजी निवेदनाद्वारे केली असतानाही त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुल्हेर येथील ग्रामीण रुग्णालयाचे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय दिनांक २५ ऑगस्ट, २००९ अन्वये मौजे मुल्हेर ता.बागलाण जि.नाशिक येथे ग्रामीण रुग्णालय मंजुर असून ५.७५ हेक्टर क्षेत्र जागा ग्रामीण रुग्णालयासाठी वर्ग करण्याबाबत सर्वसाधारण सभेत दिनांक २७.०३.२०१६ रोजी ठराव संमत करण्यात आला आहे. त्यानुसार जागेचे हस्तांतरण करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) अंशत: खरे आहे.

मौजे मुल्हेर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित असून त्यामार्फत जनतेला आरोग्य सेवा दिल्या जातात. तसेच रुग्ण संदर्भित करावयाचे झाल्यास मौजे मुल्हेर पासून ग्रामीण रुग्णालय सटाणा २५ कि.मी. व ग्रामीण रुग्णालय नामपूर ३० कि.मी. अंतरावर असून शासकीय रुग्णवाहीकामार्फत रुग्णांना संदर्भित करण्यात येते.

(३) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालय सुरु करण्यासाठी जागा उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर शहरातील शासकीय मुलांचे बालगृह, कनिष्ठ निरीक्षणगृह व वरिष्ठ अनुरक्षणगृहात अन्नधान्याचा पुरवठा कंत्राटदाराने बंद केल्याबाबत**

**(४८) * ८५२६४ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील पाटणकर चौकातील शासकीय मुलांचे बालगृह, कनिष्ठ निरीक्षणगृह व वरिष्ठ अनुरक्षणगृह तसेच काटोल रोडवरील शासकीय मुलींचे कनिष्ठ व वरिष्ठ बालगृहात दिनांक १ मे २०१७ रोजी पासून अन्नधान्याचा पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारांनी दूध, फळे, अन्नधान्य इ. पुरवठा बंद केल्याने या सर्व बालगृहातील शेकडो मुले १० ते १५ दिवस उपाशी वा अत्यंत अल्प आहारावर गुजराण करीत असल्याची बाब दिनांक १७ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र सरकारच्या एकात्मिक बाल संरक्षण योजने अंतर्गत सर्व बालगृहांना एकत्र जोडण्यात आल्याने तसेच या चारही बालगृहांवर पुरवठा करणाऱ्या कंत्राटदाराचे कोट्यवधी रुपयांचे थकीत देयक अनेक महिन्यांपासून न मिळाल्याने कंत्राटदाराने सदर पुरवठा बंद केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कंत्राटदाराची देयके वेळच्यावेळी न देण्याची कारणे काय असून त्यानुसार संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत व यासर्व बालगृहांना अन्नधान्याचा पुरवठा योग्य प्रकारे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) शासकिय मुलांचे बालगृह, कनिष्ठ निरीक्षणगृह व वरीष्ठ अनुरक्षणगृह, शासकिय मुलीचे कनिष्ठ व वरिष्ठ बालगृह नागपूर या संस्थाचा पुरवठा पुरवठादारांनी बंद केल्याने जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या निर्देशानुसार टचस्टोन फाऊंडेशन द्वारा अक्षयपात्र (सेंट्रल किचन) नागपूर या संस्थेकडून दिनांक १२ मे, २०१७ पासून संस्थेमध्ये दाखल प्रवेशितांना आहाराचा पुरवठा करण्यात येत आहे.

(२) व (३) एकात्मिक बाल संरक्षण योजनेकडून निकषाप्रमाणे म्हणजे रु. ७५०/- प्रमाणे तरतूद वितरीत करण्यात येते मात्र शासकिय संस्थांचा आहार खर्च या

बाबीवर त्यापेक्षा अधिक खर्च होत असल्यामूळे कंत्राटदारांची देयके थकित राहिलेली आहेत.

राज्यातील शासकिय संस्थांची वेतनेत्तर बाबीवरील थकित देयके अदा करण्यासाठी पुरवणी मागणीचा प्रस्ताव जूलै २०१७ च्या पावसाळी अधिवेशनात विधानमंडळासमोर सादर करण्यास प्रस्तावित करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात मुलींचे जन्माचे प्रमाण घटत असल्याबाबत

**(४९) * ८५४०८ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरोग्य विभागाने माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान जारी केलेल्या अहवालात सन २०१५ मध्ये महाराष्ट्रात लिंग गुणोत्तर एक हजार मुलांमागे ९०७ मुली असे प्रमाण असताना सन २०१६ मध्ये या लिंग गुणोत्तरात जवळपास ८ टक्के घट होऊन राज्यात मुलींचा दर ८९९ झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सर्वच जिल्हयात मुलींचा जन्मदर कमी झाला असून वाशिम जिल्ह्यामध्ये मुलींच्या जन्मदरात ६२ टक्के घट झाली असून पुणे व उस्मानाबाद जिल्हयात मुलींचा जन्मदर ५२ टक्के कमी झाला असल्याने राज्यात मुलींच्या जन्मदरात घट झाल्याची बाब सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अहवालावरुन निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुलींचे जन्मदर घटण्याची प्रमुख कारणे काय आहेत व त्यानुसार स्त्रीभृण हत्या रोखण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

नागरी नोंदणी पद्धतीनुसार सन २०१५ मध्ये महाराष्ट्रामध्ये लिंग गुणोत्तर १००० हजार मुलांच्या जन्मामागे ९६० होते. सन २०१७ च्या अंतरीम अहवालानुसार सन २०१६ मध्ये लिंग गुणोत्तर ८९९ झाले.

(२) हे अंशत: खरे आहे.

नागरी नोंदणी पद्धतीनुसार लिंग गुणोत्तरात १००० मुलांच्या जन्मामागे मुलींच्या जन्माचे प्रमाण वाशिम जिल्हयामध्ये ४९, पुणे जिल्हयामध्ये ४६ व उस्मानाबाद जिल्हयामध्ये ३४ अंकानी घट झाली आहे.

(३) स्त्रियांना देण्यात येणारा दुय्यम दर्जा.

राज्यात मुलींच्या जन्माचे प्रमाण वाढविण्यासाठी शासनाने पुढीलप्रमाणे उपाययोजना केल्या आहेत.

१) पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्यात ६०८ समुचित प्राधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

२) शासन अधिसूचना दि. २७ जुलै २००१ नुसार राज्य समुचित प्राधिकरणास त्यांचे कार्य पार पाडण्यासाठी, मदत व सल्ला देण्यासाठी दि.२०.०१.२०१६ च्या शासन अधिसूचनेनुसार ८ सदस्यांची सल्लागार समिती स्थापन करण्यात आली आहे.

३) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी दक्षता पथकाची स्थापना शासन निर्णय क्रं प्रचिनी २०११/प्र.क्र.२५६/कु.क.-२,मंत्रालय, मुंबई दि. १३.११.२०११ अन्वये करण्यात आली आहे.

४) नियमित सोनोग्राफी केंद्राची तपासणी करणे. राज्यातील समुचित प्राधिकाऱ्यांकडून पीसीपीएनडीटी कायद्याचा भंग करणाऱ्यांविरुध्द कारवाई करणे.

RCH PIP अंतर्गत पूरक योजना राबविणे तसेच टोल फ्री नंबर १८००२३३४४७५ पीसीपीएनडीटी हेल्पलाईन कार्यरत.

५) शासनातर्फे सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना राबविली जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अमरावती येथील डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय रुग्णालयात**
**चार नवजात बालकांचा झालेला मृत्यू**

**(५०) * ८५३०७ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय रुग्णालयात रविवारी मध्यरात्री चार नवजात बालकांचा अकस्मात मृत्यू झाल्याची घटना दिनांक २९ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चार नवजात शिशूंपैकी एका नवजात शिशूचा सेप्टिसिमिया मुळे मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले असून अन्य तीन मुलांच्या मृत्यूची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या चारही नवजता शिशूंच्या आकस्मिक मृत्यूची चौकशी करण्याकरीता नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय व त्यामधील प्रमुख बाबी कोणत्या आहेत,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

चार शिशूंपैकी एका नवजात शिशूचा मृत्यू सेप्टिसिमिया मुळे झाल्याचे रुग्णाचे मृत्यूप्रमाणपत्रावर उल्लेख केलेला आहे. उर्वरीत ३ नवजात शिशूचे मृत्यूचे कारण स्पष्ट नसल्यामुळे सदर शिशुचे शवविच्छेदन अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांचे समितीद्वारे करण्यात आले. या समितीचा शवविच्छेदनाचा अहवाल प्राप्त झालेला असून

त्यामध्ये “Opinion reserved” असा उल्लेख आहे. तसेच व्हिसेरा अहवाल व ब्लड रिपोर्ट केमीकल तपासणी होऊन येणे बाकी आहे. तपासणी होवून येताच शवविच्छेदन अंतिम अभिप्राय घेणेबाबत तजवीज ठेवली आहे.

(३) होय.

अ) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, अमरावती यांनी प्राथमिक चौकशी करुन दि. ३०.०५.२०१७ रोजी आपला लेखी अहवाल दिला आहे. त्यामध्ये उपचाराकरिता भर्ती असलेल्या रुग्णाची योग्य काळजी न घेतल्याने ४ नवजात बालकांचा मृत्यू ओढवला असल्याचे नमूद केले आहे.

ब) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोला यांच्या चौकशी अहवालातील निष्कर्ष थोडक्यात पुढीलप्रमाणे :-

१) ४ नवजात शिशुंचा मृत्यू हा Injection kesol (Potassium Chloride) २ cc IV याद्वारे झाला असू शकतो.

२) नवजात शिशुच्या अतिदक्षता विभागात जंतु संसर्ग मुक्त वातावरण ठेवणेबाबत निष्काळजीपणा संबंधित शिशु विभागाचे अधिकारी यांनी केल्याचे दिसून येते.

३) सदर महाविद्यालय हे संपूर्ण अमरावती जिल्हयाकरिता आरोग्य दृष्टीने प्राथमिक काळजीचे केंन्द्र आहे. त्यामध्ये बालमृत्यूचे प्रमाण अधिक असलेला मेळघाट भाग सुध्दा समाविष्ट होतो. त्यामुळे नवजात शिशु अतिदक्षता विभागातील सोयीमध्ये व देखरेखीमध्ये कोणतीही कमतरता राहु नये असे अपेक्षित आहे.

त्यामुळे सदर समितीने संबंधित विभागाचे वैद्यकीय अधिकारी(डॉ. आर.एच.निस्ताने व डॉ. भुषण कट्टा) आणि स्टाफ नर्स (श्रीमती विद्या थोरात व श्रीमती प्रिती जामनीक) यांच्या विरुध्द योग्य कारवाई करण्याचे सुचविले आहे.

(४) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोला, जिल्हा शल्यचिकित्सक अमरावती व डॉ पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन यांनी दिलेल्या अहवालावरुन गुन्हयात आरोपी १) डॉ. भुषण ब्रिजमोहन कट्टा, निवासी वैद्यकीय अधिकारी २) श्रीमती. विद्या भानुदास थोरात, स्टाफ नर्स यांना दि. ३०.५.२०१७ रोजी अटक करण्यात आली आहे. ३) श्रीमती. प्रिती रविन्द्र जामनीक, स्टाफ नर्स हिस दि. ११.०६.२०१७ रोजी अटक करण्यात आली आहे. अधिक तपास सुरु आहे.

तसेच, उपरोक्त अहवालाच्या आधारावर डॉ.निस्ताने विभाग प्रमुख, पीडीयाट्रिक्स व डॉ. कट्टा, निवासी वैद्यकीय अधिकारी, यांच्यावर कार्यवाही करण्याबाबत प्रबंधक, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद व श्रीमती विद्या थोरात व श्रीमती. प्रिती जामनीक स्टाफ नर्स यांच्यावर कार्यवाही करण्याबाबत महाराष्ट्र परिचर्या परिषद यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.